Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol (I)

12 January 2019 Special Issue – 68

# महिला सबलीकरणाच्या समस्या : आव्हाने आणि उपाय



Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Executive Editor of This Issue
Prof. A.R. Bhosle
Assist. Prof. Head of Dept. Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

Dr. S.K. Gaike
Assist. Prof. Dept. of Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

Assit. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

SWATIDHAN PUBLICATION

Visit to - www.researchjourney.net

— प्रा. पवार लक्ष्मण



Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol. ( I )

12 January 2019

SPECIAL ISSUE – 92

# महिला सबलीकरणाच्या समस्या : आव्हाने आणि उपाय

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Prof. A.R. Bhosle**
Assist. Prof. Head of Dept. Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

**Dr. S.K. Gaike**
Assist. Prof. Dept. of Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

Assit. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 400/-

| | | | |
|---|---|---|---|
| 36. | आदिवासी स्त्री जीवन : प्रश्न समस्या एक अध्ययन | के.बी. फोले, डॉ.भिसे आर.एम. | 100 |
| 37. | **साहित्य समाज और नारी** | **प्रा.बोडखे एच.डी.** | 104 |
| 38. | स्त्रियांप्रती हिंसाचार : एक सार्वदेशिक आजार | प्रा.डॉ.आनेराव एम.एम. | 106 |
| 39. | कुटूंब संस्थेतील एक नवा विचार प्रवाह - सारोगेट मदर | प्रा.मुद्दे पी.आर. | 109 |
| 40. | महिला सबलीकरण : समस्या, आव्हाने आणि उपाय | अंबुरे ऋषिकेश सर्जेराव | 111 |
| 41. | भारतातील लिंग गुणोत्तर विषमता | डॉ.सुरेश सामाले | 114 |
| 42. | भारतातील महिला अत्याचार आणि उपाय | प्रा.सुनिता जगन्नाथ कुकडे | 117 |
| 43. | बंजारा : साहित्य, संस्कृती आणि स्त्री | प्रा.डॉ.एल.एस.पवार | 121 |
| 44. | कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याची उपयुक्तता (2005) | **डॉ. देशमुख एम. बी.** | 124 |
| 45. | स्त्रियावरील कौटुंबिक अत्याचार | प्रा.मगर पांडुरंग किसनराव | 126 |
| 46. | हुंडा प्रथेचा भारतीय समाजावर झालेला परिणाम :एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.डॉ.चंद्रशेखर एस. पाटील | 129 |
| 47. | कौटुंबीक हिंसाचार आणि स्त्रिया | प्रा. तांदळे सुरेंद्र सुंदरराव | 132 |
| 48. | साहित्य, समाज और स्त्री | डॉ. पवार विक्रमसिंह विजयसिंह | 134 |
| 49. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | प्रा.गायकवाड पी.के. | 136 |
| 50. | कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ आणि स्त्री | प्रा. गायकवाड डी.डी. | 138 |
| 51. | सामाजिक चळवळीतील स्त्रियांचे योगदान | डॉ. संधीपान गायके, डॉ. तंगलवाड डी.एम. | 141 |
| 52. | हुंडा प्रथा, समाज आणि स्त्रिया | डॉ. बी. एल. म्हस्के | 145 |
| 53. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | प्रा. राठोड बी.जे. | 148 |
| 54. | महिला सबलीकरणाच्या दृष्टीने दलित महिला आणि मानवी हक्क | प्रा.संदिप कोरडे | 150 |
| 55. | महिला चळवळ अणि स्त्रिया | प्रा.डॉ. लक्ष्मण गीते | 152 |
| 56. | महिला चळवळ आणि स्त्रिया | प्रा. आर.डी.खताळ | 155 |
| 57. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा. प्रकाश साहेबराव काळवणे | 157 |
| 58. | स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय चळवळी आणि महिला सबलीकरण | डॉ. विठ्ठल भिमराव मातकर | 160 |
| 59. | महिलेविरूद्ध अत्याचार व उपाय | प्रा.कु. मुंडे ज्योती ज्ञानोबा | 164 |
| 60. | कौटुंबिक हिंसाचार कायदा आणि स्त्रिया | प्रा. डॉ. रजनी बोरोळे | 168 |
| 61. | कौटुबिक कायदे आणि स्त्रियांचा बदलता सामाजिक दर्जा | प्रा. पोकळे एस.एम. | 170 |
| 62. | भारतीय समाजातील हुंडा प्रथाःएक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा.ए.आर भोसले | 172 |
| 63. | लिंगभावना विषमता आणि भारतीय स्त्रीया | प्रा.डॉ.नागोराव संभाजी भुरके | 174 |
| 64. | महिलांच्या विकासाची वादळवाट : कायदे आणि सामाजिक दृष्टीकोण | प्रा.विलास सोमाजी पवार | 176 |
| 65. | मराठी कादंबरीत सहकारी साखर कारखान्यातील स्त्रीयांचे चित्रण: | प्रा. विनायक जाधव | 179 |
| 66. | हुंडा प्रथा : समाज आणि स्त्रीया | प्रा. उगीले माधव उत्तमराव | 182 |
| 67. | **महिला शिक्षिकांचा भूमिका संघर्ष व त्याचे परीणाम** | **प्राचार्य डॉ. राम वाघ ,<br>गोविंद द. बावस्कर** | 185 |
| 68. | महिला सबलीकरण : स्वरूप व उद्दिष्ट्ये | प्रा. डॉ. साईनाथ राधेशाम बनसोडे | 188 |
| 69. | कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा 2005 आणि स्त्रियांपुढील आव्हाने | प्रो.श्रीमती इंदू चंद्रकांत साळुंके | 190 |

Assit. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

**RESEARCH JOURNEY** International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue -92 , महिला सबलीकरणच्या समस्या : आव्हाने आणि उपाय

# बंजारा : साहित्य, संस्कृती आणि स्त्री

**प्रा.डॉ.एल.एस.पवार**
मराठी विभाग, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर जि.नांदेड.

---

**प्रस्ताविक :-**

भारतीय समाज जगाच्या पाठीवरील सर्वात संकुल आणि गुंतागुंतीचा समाज आहे. संपूर्ण भारत वर्षामध्ये कितीतरी प्रकारचे वेगळेपण असलेले मानवी समुह अधिवास करतांना आढळतात. या देशात प्रादेशिक, भाषिक, धार्मिक, जातीय व पंथीय विविधता तर मोठया प्रमाणात आहेच; परंतु या देशामध्ये सांस्कृतिक विविधताही मोठया प्रमाणात आहे. कोणताही आणि कुठलाही मानवी समाज हा त्यांच्या सांस्कृतिक संचितावरुनच आपले वेगळेपण आधोरेखित करुन आपली ओळख निश्चित करीत असतो. वेगवेगळया प्रदेशामध्ये वेगवेगळया धर्माचे लोक राहतात ते स्वतंत्रपणे आपली संस्कृती आणि आस्तीत्व जोपासतात. त्यामुळे त्यांची स्वतंत्र ओळख झालेली आहे. त्यापैकीच बंजारा समाज एक स्वतंत्र जीवनशैली आणि संस्कृती जोपासून भारताच्या वेगवेगळया प्रांतात आपले वेगळेपण टिकवून आहे.

गोरबंजारा समाज अतिप्राचीन समाज म्हणून ओळखल्या जातो. या समाजाची स्वतःची एक सामाजिक चौकट आहे. ती चौकट अनंत काळापासून आजतागायत टिकुन आहे. या समाजाच्या चालीरीती, प्रथा, परंपरा या इतर समाजाच्या तुलनेत वेगळे असून; काही प्रमाणात साम्य दिसून येते. आपल्या वेगळया सांस्कृतिक वैशिष्टयामुळे ते आज भारताच्या कानाकोपऱ्यात ओळखु येतात. भारतातील बंजारा समाजाचे मुळ स्थान हे राजस्थान आहे. परंतु राजकीय संघर्षाच्या काळात ते राजस्थान सोडून पोटापाण्याच्या सोयीसाठी जंगलाचा आश्रय घेतला. म्हणूनच आजही बंजारांचे तांडे जंगलाच्या सानिध्यात आहेत. ही त्यांची जीवन जगण्यासाठी केलेल्या धडपडीची साक्ष आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

भारतातील प्राचीन जाती-जमातीपैकी गोर बंजारा समाज क्षत्रिय वंशाचा आहे. तो पूर्वी व्यापारही करायचा आणि वेळप्रसंगी युध्दही करायचा. परंतु भारतातील रेल्वेच्या व राजकीय आक्रमणामुळे त्याची दयनीय अवस्था झाली. आणि तो उदरनिर्वाहासाठी जंगलाच्या सहवासात गेला. तेथेच गोपालन करुन शेती करु लागला. त्यापूर्वी तो मिठाचा व्यापारी म्हणून संपूर्ण भारत देशात प्रसिध्द होता. 16 व्या, 17 व्या शतकात मोगल सैन्यास धान्य पुरवठा करणे, युध्द सामग्री वाहून नेणे आणि प्रसंगी युध्दातही भाग घेणे अशी तिहेरी भुमिका बंजारांना पार पाडावी लागली. अशा समाजाला संपूर्ण भारतात लबाणी, लंबाडी, लंबाडा, बंजारी अशा अनेक नावाने ओळखल्या जाते.

बंजारा समाजाची शब्दाची उत्पत्तीही हिंदी मराठी शब्द वाणिज - व वाणिज-वाणिज्य पासून झाल्याचे बंजारा अभ्यासकांनी सांगीतले आहे. परंतु या समाजाची शास्त्रीय भाषेत व्याख्या केली तर, सर्वसाधारणपणे बंजारा कोणाला म्हणावे ? ज्यांच्यामध्ये भाषीक साधर्म्य, वेषभुषा आणि सण-समारंभाच्या कल्पना समान स्वरुपाच्या आहेत अशांना बंजारा समाज म्हणावा. हा समाज डोंगरपायथ्याजवळ राहतो. निसर्गाच्या कुशीत राहून हसतमुखाने जिवन जगतो. गायी-बैलावर प्रेम करतो आणि नागरी संस्कृतीच्या जवळ येवूनही स्वतःच्या संस्कृतीचे जीवापाड संवर्धन सण-उत्सवामधून करीत असतो. तांडयाच्या प्रमुखाच्या आदेशानुसार आपले जीवन घालवित असतो. अशा व्यवस्थेला बंजारा समाजाचे तांडे म्हणतात. आज भारत सरकारने तंटामुक्ती अध्यक्षांची संकल्पना गावोगावी सुरु केलेली आहे. परंतु ही योजना बंजारा समाजाने पंचायतीच्या रुपातून प्राचीन काळीच सुरु केलेली आहे. कदाचित ही योजना या समाजाच्या माध्यमातून भारत सरकारला मिळालेली एक देणगीच आहे. म्हणून आज गावोगावी या योजनेच्या माध्यमातून अनेक भांडणे सोडविली जातात.

इ.स. 1630 च्या सुमारास भारतात इस्लाम राजवटीच्या काळापासून बंजारांच्या संदर्भात व व्यवस्थेत अभ्यासपूर्ण उल्लेख केलेला आहे. बंजारा शिकार करणारे क्षत्रिय वृत्तीचे व शौर्यशाली होते. त्यामुळे शेरशाहाचा वजीर मुस्लीम बादशहा असरफ खॉनवरही त्याची छाप पडली. भंगी व झंगी हे असरफ खॉनच्या वेळी प्रसिध्द बंजाराचे नाईक समजले जात असत. झंगी यांचे तांडयात 1,80,000 बैल होते व भगवानदासचे 52,000 बैल होते असे कम्बरलेज साहेबांनी लिहून ठेवले आहे. अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी असणाऱ्या बंजारा समाजाला आज भारत देशात अन्यायालाच सामोरे जावे लागत आहे. कोणत्याही सुविधा त्यांच्या तांडयापर्यंत येवू शकत नाही. त्यामुळे त्यांचा फारसा विकास झालेला आढळून येत नाही.

**साहित्य आणि लोकजीवन :-**

साहित्य हा मानवी जीवनाचा महत्त्वाचा भाग असल्यामुळे साहित्य आणि लोकजीवन यांचे नाते अतुट आहे. कारण लोकजीवनाचा प्रभाव हा सतत साहित्यावर पडत असतो लोकांच्या वैशिष्टयेपूर्ण हालचालीतूनच साहित्याची निर्मिती होत असते. साहित्यात सांगीतलेल्या सदविचारांचे अनुकरण लोकजीवनातून होत असते. लोकजीवनातील कित्येक गोष्टीचे संदर्भ साहित्याला पूरक करत असतात. साहित्याच्या विविध प्रकारामध्ये लोकजीवनाचा अंश विखुरलेला असतो. साहित्यीकांच्या लेखन शैलीत लोकजीवन महत्त्वाची भुमिका पार पाडत असते. साहित्यीक ज्या वातावरणात राहतो त्या वातावरणाचा प्रभाव नकळतपणे त्यांच्या साहित्यावर पडत असतो. समाजात वावरत असतांना लोकजीवनातील रितीरिवाज, रुढी-परंपरा, लोकविश्वास, लोकश्रध्दा, लोकसंस्कृती, आचार-विचार इत्यादी घटकांनी लेखक प्रभावीत होतो. त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते. लेखक हे पैलू वेगवेगळया बाजून टिपूण घेतो. लेखनाच्या माध्यमातून समाजासमोर मांडत असतो.

प्राचीन मराठी साहित्यापासून ते आधुनिक साहित्यापर्यंत सर्वच साहित्याचे निरीक्षण केले तर, असे दिसून येते की, साहित्य आणि लोकजीवन यांचे नाते अतुट असल्याचे स्पष्ट होते.

Asst. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

1936 पासून बंजारा लोकजीवनाचे प्रतिबिंब साहित्यात पडू लागले. परंतु गोरबंजारा लोकांचा इतिहास हा ग्रंथ लिहून बळीराम पाटलांनी बंजारा साहित्याचा पाया रचला. यात समग्र बंजारा समाजाचे अस्तित्व जाणवू लागले. परंतु त्यानंतर साहित्यीकांनी या समाजातील रुढी-परंपरा याकडे डोळाही फिरवीला नाही. बोटावर मोजण्यएवढया लेखकांनीच या समाजाच्या इतिहास, परंपरा व संस्कृतीवर प्रकाश टाकला आहे. म्हणून या समाजाचे वास्तव चित्रण जोपर्यंत अन्य साहित्यीक साहित्यात मांडणार नाही तोपर्यंत बंजारा समाज कळणार नाही.

**सामाजिक जीवन :-**

बंजारा समाज पशुपालक व निसर्गपुजक आहे. त्यामुळे आपली उपजिविका करण्यासाठी त्यांना जंगलाच्या आश्रय घ्यावा लागतो. निसर्गाच्या लहरीनुसार त्यांना आपल्या राहण्याची जागा बदलावी लागायची. परंतु आज गावाच्या संपर्कामुळे ते तांडयात पक्की घरे बांधून जीवनात सुधारणा आणत आहे. ज्या ठिकाणी पाणी आणि जंगल भरपूर प्रमाणात असेल त्या ठिकाणी त्यांचे तांडे आहेत. त्यामुळेच ते निसर्गावर आपल्या जिवापेक्षाही अधिक प्रेम करतो.

बंजारा समाजात मातृसत्ताक पध्दती होती ती, आजही काही प्रमाणात आहे. त्यामुळे एकत्र कुटुंबात राहणाऱ्यांची संख्या ही अधिक होती. आईच्या प्रेमाला विरोध करण्याचे धाडस कुणातही असायचे नाही. त्यामुळे कुटुंब प्रमुख म्हणून आईच काम पाहत असत. आज नागरी संस्कृतीच्या संपर्कामुळे या सामाजिक व्यवस्थेला तडा जातांना दिसत आहे. त्यामुळे आज या समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जा मिळतो आहे. समाजाचे दुसरे घटक म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. म्हणून इतराप्रमाणे ती शोभेची वस्तू कुटुंबात ठेवली जात आहे. तिच्याकडे पाहिल्या जात आहे.

या समाजातील स्त्री रात्रं-दिवस पुरुषाबरोबर काम करते. रानावनात एकटी राहते. ती निर्भिड जिवन जगते. मरण्याची तिला भिती वाटत नाही. परंतु पुरुषांच्यापुढे शब्द काढण्याची परवानगी त्यांना नाही.

**सांस्कृतिक जीवन आणि स्त्री :-**

बंजारा समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जा आहे. पुरुषांच्या वर्चस्वामुळे तिच्या मनाचा कोंडमारा होतो. इतर समाजाप्रमाणे यांनाही एक शोभेची वस्तू म्हणूनच पाहिल्या जात असत. कुठेही तिला इतराप्रमाणे मोकळेपणाने बोलता राहता येत नव्हते. अशाही प्रसंगी मात्र पुरुषांनी त्यांना त्यांच्या सांस्कृतिक जीवनातून बेदखल केलेले नाही. त्यांनी सण-उत्सवामधून आपले सुखदुःख मांडण्याची परवानगी पुरुषांनी दिलेली होतीच. अशावेळी त्यांनी गीताचा आधार घेतला जीवन जगतांना तेच गीत त्यांना आधार वाटू लागले आणि गीतांची निर्मीती होवू लागली. यातूनच सण-उत्सव आणि गीताची जोपासना झालेली आहे. बंजारा स्त्रीगीताच्या निर्मितीत प्राचीन परंपरा आहे. कित्येक वर्षापासून निर्माण झालेल्या आणि मौखिक रुपाने प्रचलित असलेल्या या गीतांना बंजारा स्त्रियांनी जीवापाड जतन केलेलं आहेत. अशा स्त्रीगीतांना स्त्रीजीवनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्व आहे. त्यामुळेच त्या गीताव्दारे सांस्कृतिक जीवनाचे संवर्धन आणि संगोपन झालेले आहेत.

**बंजारा गीतातील स्त्री :-**

बंजारा लोकगीतात स्त्रीगीतांची संख्या विपूल आहे. स्त्रियांनी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी गीतांना जवळ केले. आजही गीतांचा आधार घेऊन पारंपरिकचे जीवन स्त्री जगतांना दिसते. काही प्रमाणात शिक्षणाच्या प्रभावामुळे बदल झालेला आहे. हे नाकारता येत नाही. परंतु सण-उत्सवाला कितीही शिकलेल्या, सवरलेल्या मुली, बाया असतील त्या आपल्या मनातील भावना समाजापुढे कुटुंबापुढे व्यक्त करतातच. इतर समाजात घडत असलेल्या घडामोडी त्यांना कळतात. परंतु त्या बदलायला तयार नाहीतच. परिणामी मुख्यसमाजाच्या प्रवाहाजवळ येवूनही या समाजातील स्त्रिया परंपरा सोडायला तयार नाहीत. त्यामुळे त्यांचे कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन मर्यादित स्वरुपाचे झालेले आहेत.

बंजारा समाजाची कुटुंब व्यवस्था व समाजमनावर धर्माचा दैववादाचा पगडा असल्यामुळे त्यातून उदयास आलेल्या आणि लोकजीवनात रुढ झालेल्या चालीरिती बंजारांचे आचारविचार, धर्म या सर्वांमधून स्त्रीजीवनावर पडणारी बंधने, तिच्याकडे पुरुषांचा दृष्टीकोन, सांस्कृतिक जीवन स्त्रियांनी गीतातून व्यक्त केले आहे. एखादया स्त्रीचे आई-वडिल वारले असतील अशा प्रसंगी समाज त्या स्त्रीला जवळ घेत नाही. तुच्छतेने तिच्याकडे पाहतो. स्त्रियाही आपल्या घोळक्यात येऊ देत नाहीत. यावेळी ती मनातील दुःख गीताच्या माध्यमातून समाजापुढे व्यक्त करते;

बला-बला कोचो
म केतीबला
मार याडी मरगी,
करन वेगेवेला,
मन आयदो सतंळो,
झूर लेमये

बंजारा स्त्री गीताची निर्मिती प्रसंगानुरुप करीत असते. ज्या समाजाने वाळीत टाकले. अशा समाजाला ती गीताव्दारे आपल्या दुःखाची जाणीव करुन देते. वरील गीताच्या अनुषंगाने एका आई मृत्यू पावलेल्या स्त्रीला समाज, स्त्रिया स्विकारत नाही. तेंव्हा माझा त्यात काय दोष आहे. असे ती स्त्रियाला सांगते. मला पुन्हा तुमच्यात येऊ दया अशा विनंती करते. याचा अर्थ जे ती समोरासमोर निर्भीड बोलू शकत नाही. तेच विधान गीतांच्या माध्यमातून नम्रतापूर्वक भावना लोकांपर्यंत पोहचवित असतात.

Asstt. Prof.
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded

थोडक्यात, बंजारा समाजाची सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक जीवनाची पार्श्वभूमी पाहतांना असे वाटते की, पारंपरिक बंजारा व्यवस्थेने स्त्रीला दुय्यम स्थान दिलेले आहेत. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने तीचे पध्दतशिर प्रयत्न केलेला आहे. परंतु समाजातील वेगवेगळया विधींच्या निमित्ताने स्त्रीमनातील भावनांचा सहजस्फुर्त अविष्कार बंजारा स्त्रीगीतातून झालेला आहे. देवी-देवतांची भक्ती करणे, अंधश्रध्देवर विश्वास ठेवणे हा त्यांचा स्थायीभाव असल्यामुळे बंजारा स्त्री धार्मिक व श्रध्दाळू बनलेली आहे. त्यामुळे त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन, त्यांच्या जीवनातील सुखदुःख, गीतांच्या माध्यमांतून लोकांपर्यंत अत्यंत उत्कटतेने पोहचलेला आहे. परंतु शिक्षणाच्या व शहरांच्या संपर्कामुळे त्यांचे आचार-विचार आज बदलत आहे. हे सत्य नाकारुन चालणार नाही.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) डॉ.लक्ष्मण पवार - बंजारा : समाज, संस्कृती आणि स्त्री.
2) डॉ.रुक्मिनी पवार - बंजारा लोकजीवन पध्दती.
3) प्रा.मोतीराज राठोड - भटक्या विमुक्तांचा जाहिरनामा.
4) रामनाथ चव्हाण - जाती आणि जमाती.
5) बळीराम पाटील - गोर बंजारा लोकांचा इतिहास.
6) डॉ.गणपत राठोड - बंजारा लोकगीतों का सांस्कृतिक अध्ययन.

Asstt. Professor
H.J.P. College, Himayatnagar
Tq. Himayatnagar Dist. Nanded